PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Aaytya Gharat Gharoba
Year: 1991

Song: Yash Chaluni Aale Daari
Lyricist:

हिम्मत ही मर्दाची किम्मत ही कष्टाची
श्रमणाऱ्या हातांना शक्ती ही दैवाची
आशेच्या वेलींना पुष्पे ही विजयाची
यश चालूनी आले दारी
यश चालूनी आले दारी
आज आनंदी आनंद जरतारी
यश हे यश हे
यश चालूनी आले दारी
यश चालूनी आले दारी

जुळती नाती अशी मिळता माणुसकी
लाभे मित्र असा कुणीही होई सुखी
जुळती नाती अशी मिळता माणुसकी
लाभे मित्र असा कुणीही होई सुखी
धनाची श्रीमंती क्षणाची श्रीमंती
मनाची श्रीमंती ही खरी श्रीमंती
ओ... हो... ओ...
रूपया रूपया
रूपयाची दुनियासारी
रूपयाची दुनियासारी
नाचे नाण्यावरी हे जग चंदेरी
यश हे यश हे
यश चालूनी आले दारी
यश चालूनी आले दारी

यार वै वै यार वै वै
यार वै वै यार
यार वै वै यार वै वै
यार वै वै यार

अशी यारी असावी
जशी हृदयी ठसावी
सुखाचा हात मिळता
नवी दुनिया हसावी
अशी यारी असावी
जशी हृदयी ठसावी
सुखाचा हात मिळता
नवी दुनिया हसावी
कळी उमलून यावी
सुगंधे दरवळावी
मनाच्या मोहराला
तुम्ही हो दाद द्यावी
ओ... हो... ओ...
यश हे यश हे
यश चालूनी आले दारी
यश चालूनी आले दारी
हां...
चला रे गा या नाचा हे
आज या नवरंगाचा हे
नवा हा उल्हासाचा
असा जल्लोष सारा
ताल अंगात आला हे
सूर कंठात आला हे
यशाचा वाजे डंका
असा जल्लोष सारा
वाजवा बॅण्ड बाजा
लागले झेंडे आता
हो वाजवा बॅण्ड बाजा
लागले झेंडे आता

आज दिन प्यारा प्यारा
असा जल्लोष सारा
आज दिन प्यारा प्यारा
असा जल्लोष सारा
चला रे गा या नाचा हे
आज या नवरंगाचा हे
नवा हा उल्हासाचा
असा जल्लोष सारा

नवा हा उल्हासाचा
असा जल्लोष सारा
ओ... हो... ओ...
यश हे
हां...
यश चालूनी आले दारी
यश चालूनी आले दारी
यश चालूनी आले दारी

Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.

PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.